

# सामान्य प्रशासन विभागाचे कामकाजाचे स्वरुप

१) विविध संवर्गातील पदनिर्मिती (तांत्रिक व बिगर तांत्रिक) बाबत कार्यवाही करणे, मा.शासनाकडून पदनिर्मितीस मान्यता घेणे.

२) संवर्गात पदभरती करणे.

३) वारसत्व व अनुकंपातत्वाने नियुक्तीबाबत प्रस्ताव सादर करणे.

४) प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांचे वेतन व इतर पत्रव्यवहार करणे.

५) पदोन्नती व बदल्या

६) आस्थापना खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे.

७) मागासवर्ग कक्षाकडील राखीव प्रवर्गाचे रोस्टर अद्ययावत ठेवणे.

८) विभागीय चौकशी / निलंबन.

९) महापालिका कर्मचारी / अधिकारी यांचेसाठी प्रशिक्षण आयोजित करणे.

१०) कर्मचारी / अधिकाऱ्यांची मालमत्ता विवरणपत्र प्राप्त करुन घेणे. (वर्ग १ ते ३)

११) कामगार संघटनांशी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंबंधी चर्चा व तत्सम बाबी.

१२) अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतन व इतर प्रदाने.

१३) वेतनश्रेणी करार.

१४) न्यायालयीन प्रकरणे.

१५) केंद्रिय माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहिती अधिकार / अपिल.

१६) अधिकारी / कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल जतन करणे.

१७) नाहरकत प्रमाणपत्र (पासपोर्ट / परदेश प्रवास परवानगी)

१८) तारांकीत / अतारांकीत प्रश्न / मा.शासन पत्रव्यवहार.

<u>विभागाचा तपशील :-</u>

महानगरपालिकेतील एकूण मंजूर पदांची संख्या :- ५३८५

अधिक माहिती :-

१) मा.महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २००८ च्या आधारे सोलापूर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे प्रारुप सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण नियम २००८ तयार करण्यात येवून मा.म.न.पा.चे मान्यतेस्तव सादर करणेत आलेला आहे. मा.म.न.पा. मान्यतेअंती सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेस्तव सादर करणेत येणार आहे.

२) महानगरपालिका कर्मचारी यांना सहाव्या वेतन संरचनेनुसार वेतन अदा करण्यात येते.

३) सोलापूर महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांना संवर्गनिहाय खालीलप्रमाणे अनुय भत्ते आदा करण्यात येतात. फिरती भत्ता, धुलाई भत्ता, घाण भत्ता, स्कुटर मोटार सायकल भत्ता, गणवेश भत्ता, सायकल भत्ता, अपंग भत्ता इ.

चतुर्थश्रेणी कर्मचारी सफाई कामगार यांचेसाठी खालील योजना राबविण्यात येतात.

१) मा.शासन निर्णयानुसार ज्या सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधी २५ वर्षे झाला आहे अशा सफाई कर्मचाऱ्यांना मोफत सदनिका देण्याची कार्यवाही सुरु आहे.

२) वर्ग ३ व वर्ग ४ मधील कर्मचारी सेवेत असताना मयत झाल्यास त्यांच्या वारसास अनुकंपा तत्त्वाने मा.शासन निर्णयानुसार नियुक्ती देणेची कार्यवाही करण्यात येते.

३) सफाई कामगार संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वारसास वारसा तत्त्वाने नियुक्ती देण्यात येते.

४) विशेष भरती मोहिमेअंतर्गत रिक्त पदे भरणेबाबत कार्यवाही करण्यात येत असते. तसेच अपंग प्रवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत कार्यवाही करण्यात येते.

विभागाची कामगिरी :-

१) आजतागायत प्रशासकीय कामकाज, कामकाजातील सुधारणा, अधियमातील माहिती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, महाराष्ट्र राज्य सेवा शर्ती नियम यांचे अधिकारी / कर्मचारी यांना विविध शासन संस्था व विषय तज्ञामार्फत वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

२) अनुकंपा तत्त्वाखालील नियुक्ती देण्यात येणाऱ्या उमेदवारांच्या अर्ज दाखल तारखेनुसार पदनिहाय याद्या तयार करणे, वेळोवेळी अद्यावत करणे.

३) बायोमेट्रिक मशीन्स बसविण्याबाबत कामकाजाचे नियोजन करणे.

४) वारस तत्त्वाने नियुक्तीची प्रकरणे हाताळणे, तसेच प्रकरण पूर्तीअंती आस्थापनेवरील रिक्त पदांचा आढावा घेवून त्याप्रमाणे नियुक्ती देणे.